मा.मुख्यमंत्री /मंत्री /राज्यमंत्री /मुख्य सचिव, अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव / सचिव या मंत्रालयीन अधिकारी तसेच मा.मुख्यमंत्री सचिवालयातील जनसंपर्क अधिकारी त्यांच्या कार्यालयीन दालनात दूरचित्रवाणी संच्यासाठी आवश्यक असलेली केबल सेवा, सेट-टॉप बॉक्स इत्यादी सेवा पुरविण्याकरीता क्लासिक एंटरटेनमेंट नेटवर्क, मुंबई या कंपनीला दि.१/५/२०१९ ते ३०/४/२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग,

शासन निर्णय, क्र.टिईएल-१०१९/प्र.क्र.३८/२२,

मंत्रालय, मुंबई-४०००३२

दिनांक: १३ जुन, २०१९

<u>वाचा</u>:- शासन निर्णय,क्र.टिईएल१०१३/प्र.क्र.२०/२०१३/२२, दिनांक: १३ मे,२०१६

<u>प्रस्तावना</u>:

मा.मुख्यमंत्री/मंत्री/राज्यमंत्री/मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव या मंत्रालयीन अधिकारी तसेच मा.मुख्यमंत्री सचिवालयातील जनसंपर्क अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयीन दालनातील दूरचित्रवाणी संचासाठी आवश्यक असलेली केबल सेवा, सेट-टॉप बॉक्स इत्यादी सेवा पुरविण्याकरीता दरामध्ये सुसूत्रता राहण्यासाठी व मंत्रालयीन सुरक्षिततेच्यादृष्टीने मे. क्लासिक एंटरटेनमेंट नेटवर्क, मुंबई यांचे सोबत दि.१ मे, २०१६ ते दि.३० एप्रिल, २०१९ या कालावधीकरीता सेवाकरार करण्यात आला होता.सदर सेवाकरार दि.३०.४.२०१९ रोजी संपुष्टात आल्यामुळे मे. क्लासिक एंटरटेनमेंट नेटवर्क, मुंबई यांना दि.१.५.२०१९ ते ३०.४.२०२१ या दोन वर्षाच्या कालावधीकरीता मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुषंगाने आता शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

शासन निर्णय:-

मा.मुख्यमंत्री/मंत्री/राज्यमंत्री/मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव या मंत्रालयीन अधिकारी तसेच मा.मुख्यमंत्री सचिवालयातील जनसंपर्क अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयीन दालनातील दूरचित्रवाणी संचासाठी आवश्यक असलेली केबल सेवा, सेट-टॉप बॉक्स इत्यादी सेवा पुरविण्याकरीता शासन निर्णय, क्र.टिईएल-१०१३/प्र.क्र.२०/२०१३/२२, दिनांक १३ मे, २०१६ अन्वये दि.१ मे, २०१६ ते दि.३० एप्रिल, २०१९ या त्रैवार्षिक कालावधीचा मे.क्लासिक एंटरटेनमेंट नेटवर्क, मुंबई या कंपनी सोबतचा सेवा दरकरार दि.३० एप्रिल,२०१९ रोजी संपुष्टात आला आहे.

क्लासिक एंटरटेनमेंट नेटवर्क, मुंबई यांचेकडून यापूर्वी देण्यात आलेल्या सेवा समाधानकारक आहेत व आर्थिक दृष्टयाही किफायतशीर ठरत असल्याने त्यांना नवीन सेट-टॉप बॉक्स दर प्रती नग रु.४३००/- व मासिक शुल्क प्रती नग रू.६२५/- इतक्या या पुर्वीच्याच दराने खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून दिनांक १/५/२०१९ ते ३०/४/२०२१ या २ वर्षाच्या कालावधीकरीता मुदतवाढ देण्यात येत आहे.

१) मा.मुख्यमंत्री/मंत्री/राज्यमंत्री/मंत्रालयीन प्रशासकीय विभागांचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांच्या कार्यालयातील दूरचित्रवाणी संचाकरीता लागणारे केबल सेवा, सेट-टॉप बॉक्स इत्यादींचा दर्जा उच्च प्रतीचा असावा.

२) दूरचित्रवाणी संचाकरीता लागणारे केबल साहित्य व केबल सुविधा माफक दरात पुरवावी.

३) दूरचित्रवाणी संचाकरीता लागणारे केबल साहित्य व केबल सुविधेचे दरपत्रक स्विकारल्यानंतर कोणत्याही परिस्थतीत दर वाढवून दिले जाणार नाहीत.

४) दूरचित्रवाणी संचाकरीता लागणारे केबल साहित्य व केबल सुविधेसाठी जे दर ठरविण्यात आले आहेत, ते दर तसेच अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

५) करार कालावधीत सेवा असमाधानकारक आढळल्यास करार रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील

६) रु. ५०,०००/- एवढ्या रक्कमेची बँक गॅरेंटीची प्रत शासनास सादर करावी.

७) भविष्यात आवश्यकतेनुसार काही अटी व शर्ती समाविष्ट करावयाच्या झाल्यास तसे करण्याचा हक्क शासनास राहतील.

८) पुर्वीच्याच दराने दूरचित्रवाणी संचाकरिता लागणारे केबल साहित्य व सुविधा पुरविणे बंधनकारक राहील.

९) शासनाशी केलेला करार मध्येच खंडीत करता येणार नाही.

१०) दूरचित्रवाणी संचाकरिता लागणारे केबल साहित्य व केबल सुविधा पुरविण्याचे कंत्राट दिल्यानंतर याबाबतची देयके संबंधित प्रशासकीय विभागाच्या उप सचिवांनी प्रमाणित केल्यानंतर त्या विभागाकडून अदा करण्यात येतील.

११) शंभर रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर शासनासमवेत करारनामा करावा.

२. सदर शासन निर्णय आदेशाच्या दिनांकापासून अंमलात येईल.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१९०६१३१५३५०९०९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pradnya Prakash Sawant

Digitally signed by Pradnya Prakash Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=dcab5c13648ccfdd9424ee4584da4e72f3f6f06dfd6b1eaa22 0fc9de68f36473, cn=Pradnya Prakash Sawant
Date: 2019.06.13 15:23:19 +05'30'

(प्र. प्र. सावंत)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. विरोधी पक्षनेते, दोन्ही सभागृह, महाराष्ट्र विधान मंडळ, मुंबई.
२. सर्व सन्माननीय विधानसभा/परिषद व संसद सदस्य.
३. मा.राज्यपालांचे सचिव.
४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
६. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२.
७. अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग.
८. मुख्य मंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई-३२.
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

११. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१२. अवर सचिव (का.विनियम), वित्त विभाग मंत्रालय, मुंबई-३२
१३. सर्व मंत्रालयीन विभाग.
१४. शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय आवार, मंत्रालय, मुंबई - ३२
१५. शाखा अभियंता (सा.बां.) बंगलो, नवीन प्रशासकीय भवन, तळमजला, मुंबई - ३२
१६. कार्यसन अधिकारी, का.२१-अ, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२
१७. क्लासिक एंटरटेनमेंट नेटवर्क, ७, पंकज को.ऑ.हौ.सो.लि., नेहरु रोड, वाकोला, सांताक्रुझ (पू.), मुंबई-५५.
१८. निवडनस्ती.